"त्याचं मराठी  जप"

मे २०१८ साली आम्ही अमेरिकेत परत आलो. मोठा मुलगा तेव्हा ७ वर्षांचा होता . खरंतर पुण्याहून  इथे येताना मन खूप साशंक होतं. नीट बसलेली घडी विसकटणे नको वाटत होतं. शाळा, भाषा ह्या विषयी खूप संभ्रमः होते. तेव्हाच एका  मैत्रिणी शी फोन वर संवाद झाला, ती म्हणाली "अजिबात काळजी करू नकोस. इथल्या शाळेत रुळायला मुलाला काही त्रास होणार नाही. English भाषा पण पटकन शिकेल  इथे. फक्त त्याचं मराठी जप " खरंतर तिच्या बोलण्याचं तेव्हा नवल वाटलं. आपण रोज मराठी बोलतो ,ऐकतो ,मुलांना वाचून दाखवतो , एवढ्यात असा काय हा मराठी विसरेल असा विश्वास वाटला . पण २ च महिन्यात फरक जाणवला. आजूबाजूच्या मुलांबरोबर खेळून इंग्लिश अगदी सराईता सारखा बोलायला लागला. प्रश्नाची उत्तरे पण इंग्लिश मधून येऊ लागली आणि मग मात्र माझे मन सैरभैर झाले. आणि इथून च सुरु झाला मराठी शाळे चा शोध.

दर रविवारी मंदिरात भरणारी ट्रॉय मराठी शाळा , व त्या विषयी माहिती मिळाली. सप्टेंबर मध्ये शाळा सुरु झाली आणि एवढ्या मुलांना एकदम बघून खरंच बरं वाटलं. मुलाला शाळेत खूप मुलांशी मराठीत संवाद साधता येणार ह्याचा विचार करूनच हायसं वाटलं . शाळा सुरु झाली आणि त्याबरोबर त्याच्या ज्ञानात पडणारी भर देखील. विविध खेळ, शब्दांच्या भेंड्या, श्लोक, गोष्टी, शब्दकोडी ,चित्रनिरीक्षण ,कविता  गाणी आणि बरंच काही त्याच्या शब्दभांडारात भर च घालत होते. नेहमी शाळेत भेटणारे मित्र आता बाहेर भेटले कि मराठीत गप्पा मारू लागले . दर रविवार चा गृहपाठामुळे आठवडाभर उजळणी होतच असे.शाळेत महत्वाचे दिवस आणि सण जसे कि दिवाळी , संक्रांत, पाडवा ,  शिवजयंती , २६ जानेवारी , गांधी जयंती इत्यादी विषयी मुलाला माहिती मिळू लागली. खऱ्या अर्थाने मराठी फक्त भाषा म्हणून न शिकता एक संस्कार म्हणून त्याला उमजू लागली  आणि आम्हाला वाटणारी भीती नाहीशी झाली :)

खरंतर नवीन मातीत हे रोपटं रुजवणं , इथल्या मातीशी जुळवून घेणं पण आपले संस्कार , भाषा न विसरता तसंच बहरण  हि कल्पना तशी अवघड आहे. पण मराठी शाळेने नक्कीच ह्या कार्याला पालकांना मदत केली आहे.  शाळेचा गृहपाठ म्हणून एकदा मुलाला आजीला पत्र लिहायला सांगितलं होतं . त्याने ते लिहलं आणि आम्ही ते आजीला फोटो काढून पाठवलं. त्यानंतर झालेल्या विडिओ कॉल मध्ये आजीच्या डोळ्यातलं पाणी खूपच बोलकं होतं. आजोबांच्या बोलण्यात जेव्हा "हा अजून तसंच मराठी बोलतो ग " असे  आले तेव्हा आम्हाला हि बरं वाटलं  : दिवाळी असो व पाडवा , सणाची माहिती सांगताना किंवा ते साजरे करताना "Why do we have to do this" असा त्रासिक भाव न येता त्याने देखील ह्या सगळ्याचा आनंद घेतला. ह्याचं श्रेय शाळेला ...

ह्याच वर्षी शाळे मध्ये मुलांचे  वाचन करून घेण्यासाठी Volunteer म्हणून काम करण्याची  मला  संधी मिळाली . ह्या मुलांना गोष्टी वाचायला खूप आवडतात  हे जाणवलं. लहानपणी वाचलेल्या राजाच्या, परिकथेच्या ,पंचतंत्राच्या गोष्टी आठवल्या. मुलांना मराठी भावविश्वात घेऊन जाण्याचा शाळेचा हा प्रयत्न  नकीच स्तुत्य  आहे. माझ्या मुलाला देखील आता मराठी पुस्तके वाचयाला  आवडू लागली आहेत . वाचनामुळे नक्कीच लिहिणे आणि बोलणे ह्यात चांगलाच  फरक पडला आहे . अर्थात मर्यादित काळासाठी भारतामधून इथे आलेल्या व्हिसाधारकांसाठी  सध्याच्या अनिनिश्चितते च्या काळात परत स्वदेशी कधी जावे लागेल ह्याची खात्री नसते . असे असताना परत जाऊन आपली मुले शाळेत परत एकदा रुळतील कि नाही, पुन्हा एकदा भाषेचा प्रश्न येईल का अश्या शंका सतत भेडसावत राहतात. पण मराठी शाळे मुळे हे Transition सोपे होईल एवढं मात्र नक्की ....

२०१९ पासून शाळेत पहिलीच्या वर्गाला शिकवण्याची संधी मिळाली  आणि  ह्या सगळ्याच शिक्षकांची मेहनत आणि शिकवण्याची तळमळ जवळून अनुभवता आली. हि मुले रोज  शाळेत ६ तास इंग्लिश बोलतात ,इतर क्लास मध्ये  पण संभाषणाचे माध्यम इंग्लिशचं. असे असताना  ह्यांना मराठी  शब्द लिहायला  , वाचायला शिकवणे खरंतर खूप कठीण आहे . पण हळूहळू जाणवले " केल्याने  होत आहे रे , आधी केलेची पाहिजे".  वर उल्लेख केल्याप्रमाणे, शब्दकोडी , शब्दांच्या भेंड्या  आणि अश्या बऱ्याच गोष्टींचा वापर करावा  लागला. ह्या सगळ्यात सिनियर शिक्षकांचं मार्गदर्शन हि

तितकंच मोलाचं होते . वयानुसार आणि इयत्तेनुसार BMM ने तयार केलेला अभ्यासक्रम परिपूर्ण आहे. मुलांना भाषेची भीती न वाटू देता त्यांना त्यात रस वाटला पाहिजे असं शिकवणे हे अजून एक आव्हान . आजूबाजूच्या भौगोलिक वातावरणाचा विचार करून शिकवणे हे अजून एक Challenge . उदा ह्या मुलांना आंब्याचा मोहोर कदाचित समजणार नाही पण हिवाळ्यातील बर्फाचा वर्षाव नक्कीच जवळचा वाटतो. एक शिक्षक म्हणून हे सगळं काहीतरी नवीन देऊन जाणारा अनुभव आहे.

सध्या सगळ्या जगालाच corona महामारी ने ग्रासलं आहे. शाळा नि online शिकवणं चालू केलं आहे. असं असताना आमच्या मराठी शाळे ने तरी मागे का राहावे ? झूम मीटिंग च्या माध्यमातून दर रविवारी अजूनही शाळा भरते . प्रार्थना म्हणून नेहमीसारखी शाळा सुरु होते आणि रीतसर मुलांना शिकवणे हि . वर्गात पुढे येऊन वह्या दाखवणारी हि छोटी मुले झूम मीटिंग च्या कॅमेरा समोर वही आणून दाखवतात. आठवडाभर काय काय केले हे सांगण्यासाठी जणू त्यांची चढाओढ लागते. ह्या वर्षी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन होऊ शकणार नाही म्हणून हि मुले शाळेच्या शेवटच्या दिवशी एक नाटुकली सादर करणार आहेत. हि नाटुकली त्यांनी स्वतःच बसवली आहे. हि शालेय वर्ष संपताना मिळणारी मुलांकडून आणि पालकांकडून मिळणारी पावतीच नव्हे काय....

ह्या उमलत्या वयात मुलांमध्ये मराठी ची जपणूक होतीये हे दिलासादायक आहे . शाळा आणि मुलांचे हे नाते असेच अतूट राहावे हि सदिच्छा........

Author - Mrs. Sneha S. Vipat
School - Troy Marathi Shala
MI,USA